|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र. कबचौउमवि/१४/विवि / 07 /२०२२ दि. १७/१२/२०२२

प्रति,
१) मा.प्राचार्य/ संचालक विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्था
२) मा.संचालक, विभाग प्रमुख विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभाग

**विषय :- विद्यापीठामार्फत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता महाविद्यालयांना देण्यात आलेले उपक्रम राबविण्याबाबत..**

महोदय/ महोदया,

शैक्षणिक वर्ष 2022-23 करीता विद्यापीठ अधिक्षेत्रातील संलग्न महाविद्यालये, मान्यता प्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांच्या पातळीवर राबविण्यासाठीचे नियमित उपक्रमांची नियमावली सोबत जोडून पाठवित आहोत. नियमावलीप्रमाणे उपक्रमासाठी खर्चाचे नियोजन करावे.

आपला विश्वासू,

18/01/23

(प्रा. सुनील कुलकर्णी)
**संचालक, विद्यार्थी विकास** (अ.का.)

**प्रत -**
१) विभागप्रमुख, मा.कुलगुरु कार्यालय,कबचौउमवि, जळगाव
२) विभागप्रमुख, मा.प्र-कुलगुरु कार्यालय,कबचौउमवि, जळगाव
३) विभागप्रमुख, मा.कुलसचिव कार्यालय,कबचौउमवि, जळगाव

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

Grade – A Grade
NAAC Re-Accredited (3rd Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## शैक्षणिक वर्ष 2022-23
## अधिक्षेत्रातील संलग्न महाविद्यालये, मान्यता प्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांच्या पातळीवर राबविली जाणारी उपक्रम तसेच स्वातंत्र्यदिन अमृत महोत्सवी वर्षानिमित्त महाविद्यालयीन उपक्रम व्यातिरीक्त देण्यात आलेल्या उपक्रमांची नियमावली-

★ नियमावली ★

**स्वातंत्र्यदिन अमृत महोत्सवी वर्षानिमित्त महाविद्यालयीन उपक्रम व्यतिरीक्त देण्यात आलेल्या उपक्रमांची नियमावली :-**

---

## १) आत्मनिर्भर युवती अभियान नियमावली -

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना अभ्यासेत्तर इतर उपक्रमात सहभागी होण्यास प्रवृत्त करुन त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास व विविध अंगाने आत्मनिर्भरता निर्माण होण्याकरीता जस की सायबर क्राईम जनजागृती, बॅक व्यवहार जागृती, कृषी विषयक जागृती, स्व आरोग्य, स्वयंरोजगारच्या विविध योजना तसेच पर्यावरण जागृती, सॉफ्ट स्किल, योगा व विविध कला गुण विकसित करणे या भूमिकेतून विद्यापीठाने आत्मनिर्भर युवती अभियान ही योजना शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत सुरु करण्यात येत आहे.

विद्यार्थीनी विविध सामाजिक, आर्थिक, कायदेविषयक, आरोग्यात्मक, पर्यावरणात्मक, डिजिटल क्रांती व त्यातून निर्माण होणारे सायबर क्राईम्स, सोशल मिडीया जनजागृती या सर्वांगाने आत्मनिर्भर व्हाव्यात या दृष्टीकोनातून आत्मनिर्भर होण्यासाठी सदरची योजना हाती घेण्यात आलेली आहे. या अभियानांतर्गत विद्यार्थीनींचा आत्मविश्वास वृध्दिगत करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

**योजनेची पात्रता** :- ही योजना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्था व विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा- विभाग यामध्ये पदविका, पदवी पदव्युत्तर शिक्षण घेणा-या नियमित विद्यार्थीनींकरीता राबविण्यात येते.

**योजनेसाठीचे अनुदान :-** या योजनेसाठी विद्यापीठाकडून १५ हजार रुपये अनुदान देण्यात येईल. खर्चाचे नियोजन खालीलप्रमाणे आहे.

- सदर उपक्रमासाठी विषयतज्ज्ञ/ साधन व्यक्तीचे मानधन रु. १ हजार प्रती सत्र **RTGS/NEFT व्दारे देणे.**
- फोटो, बॅनर,पोस्टर, चहा-नास्ता इ. अनुषंगीक खर्चासाठी. **(अनुदानाच्या २० % कमाल मर्यादा)**
- क्षेत्र भेटीसाठी प्रवास खर्च **(अनुदानाच्या २० % कमाल मर्यादा)**
- आपल्या परिसरातील विद्यापीठाचे विविध प्राधिकरण सदस्य/ अधिकारी यांना निमंत्रीत करावे.
- सदर उपक्रमाचे हिशेब उपक्रम समाप्ती नंतर १५ दिवसाच्या आत सादर करावेत. **(प्राचार्य व विद्यार्थी विकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीने)**

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

१) कार्यक्रमाच्या पहिला दिवशी महाविद्यालयात किंवा क्षेत्रभेटच्या माध्यमातून नजीकच्या पोलीस स्टेशन मधील पोलीस अधिका-यांना आमंत्रित करुन त्यांच्याकडून सायबर क्राईम, सोशन मिडीयाचा योग्य वापर करणे बद्दलची माहिती घेणे व डिजीटल फसवणुकीबद्दलची जनजागृती करणे.

२) दुसरा दिवस राष्ट्रीयकृत बॅक अधिकारी व कृषी अधिकारी यांना महाविद्यालयात आमंत्रित करुन कृषी विभागाच्या व बॅक संदर्भात व्यवहाराच्या यासंदर्भात विद्यार्थीनींना माहिती देऊन जनजागृती करणे.

३) तिसरा दिवस विद्यार्थीनींच्या आरोग्य संदर्भात प्राथमिक आरोग्य केंद्रातील अधिकारी किंवा नामांकित महिला डॉक्टर्स याच्या माध्यमातून आरोग्य विषयक जनजागृती करणे तसेच मुलींचे एच बी चे प्रमाण तपासण्या संदर्भात कॅम्प लावणे.

४) चौथ्या दिवशी युवती स्वयंरोजगार प्रशिक्षण व स्वयंरोजगाराच्या विविध शासकीय योजना संदर्भात जनजागृती करणे

५) पाचव्या दिवशी नेतृत्व गुण, पर्यावरणात्मक, सॉफ्ट स्किल व विविध कला गुण या संदर्भात जनजागृती करणे.

६) अभियानाच्या सहाव्या दिवशी समारोप करतांना समारोप समारंभाच्या प्रमूख अतिथी समोर विद्यार्थीनीनी पाच दिवसात घेतलेल्या प्रशिक्षणाची पीपीटी तयार करुन किंवा एखादा प्रोजेक्ट तयार करुन समुहात्मक सादरीकरण सादर करणे व त्याचा अहवाल विद्यापीठास सादर करणे आवश्यक असेल.

प्रस्तुत योजनेअंतर्गत महाविद्यालयीन शिक्षण घेणा-या पन्नास विद्यार्थीनीचा (त्याच महाविद्यालयातील) एक समूह तयार करुन प्रत्यक्ष क्षेत्रभेट देऊन कृती सत्राचा सहा दिवसांचा कालावधी ठरवून दररोज किमान दोन तास विविध विषयांवर चर्चासत्र, क्षेत्रभेट आयोजन करुन प्रत्येक विषयावर आधारीत लघू शोध प्रबंध तयार करुन घेणे.

या उपक्रमाचे उद्‌घाटन समारंभ करता येणार नाही फक्त समारोप समारंभ घेण्यात यावा. तसेच जिओ टॅगचे फोटो सादर कार्यक्रमाचे अहवाल सोबत लावणे आवश्यक असेल.

सदर उपक्रम विभागनिहाय तीन महाविद्यालयांना (बारा महाविद्यालयांमागे तीन महाविद्यालयांना १२ : ०३) एका शैक्षणिक वर्षाला दिला जाईल तसेच दुस-या वर्षी मागील वर्षी दिलेल्या महाविद्यालयांना हा उपक्रम मिळणार नाही. दुस-या वर्षी नविन महाविद्यालयांना हा उपक्रम मिळू शकेल.

या अभियानात साधन व्यक्ती म्हणून बॅक अधिकारी, पोलीस अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉक्टर्स, नामांकित महिला डॉक्टर्स, कृषी अधिकारी, विद्यार्थी विकास अधिकारी, स्वयंरोजगार प्रशिक्षण देणा-या संस्था किंवा व्यक्ती असतील. विद्यार्थी विकास विभागाने ठरवून दिलेल्या प्रमाणे मानधन देण्यात यावे.

योजना राबविण्यात विषयी जिल्हा समन्वयक, विद्यार्थी विकास अधिकारी यांचे अभिप्राय आवश्यक घ्यावे व विद्यार्थ्यांना दिल्या जाणा-या प्रमाणपत्रावर जिल्हा समन्वयकाची स्वाक्षरी घ्यावी. सदर उपक्रमांचे युटिलायझेशन सर्टिफिकेट व हिशेब संदर्भात यापुर्वीचे नियम लागू असतील.

## २) अग्निवीर सैन्य दल भरती पुर्व प्रशिक्षण अभियान -

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना अभ्यासेत्तर इतर उपक्रमात सहभागी होण्यास प्रवृत्त करुन त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास व विविध अंगाने आत्मनिर्भर व सशक्त भारताचे स्वप्न पुर्ण करण्याकरीता युवकांची एक महत्वपुर्ण भुमिका राहिलेली आहे. या उद्देशाने युवकांमध्ये राष्ट्राभिमान, राष्ट्रसेवा व शिस्त हे मुल्य रुजविण्यासाठी व त्यांना या दृष्टीकोनातून कौशल्य युक्त बनविण्यासाठी ही योजना शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून विद्यापीठ क्षेत्रातील संलग्नित महाविद्यालय व विद्यापीठ प्रशाळा-विभाग मधील पदविका, पदवी, पदव्युत्तर विद्यार्थ्याकरीता लागू करण्यात येत आहे.

**अभियानाचे स्वरुप :-**

या उपक्रमामध्ये त्याच महाविद्यालयातील ४० विद्यार्थ्यांना त्यामध्ये मुलं व मुली मिळून अग्निवीर पुर्व प्रशिक्षण, सैन्य व पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण दिले जाईल. या उपक्रमाचा कालावधी एकूण सहा दिवसांचा असेल. एनसीसी चे १८ बटालियनचे अधिकारी किंवा कमांडर पाच दिवस सदर महाविद्यालयात येऊन विद्यार्थ्यांना किमान दोन तास On Ground व थेअरी प्रशिक्षण देतील. सहाव्या दिवशी पाच दिवस घेतलेल्या प्रशिक्षणाची रंगीत तालीम व डेमो समारोप समारंभाच्या दिवशी प्रमुख पाहुण्यांसमोर सादर करण्यात यावा. यासंदर्भात संबंधित महाविद्यालयाने सुध्दा उपक्रम घेण्या अगोदर महाराष्ट्र १८ बटालियन त्यांच्याशी एम ओ यु करार करुन किंवा त्यांच्याशी चर्चा करुन सदर उपक्रमात त्यांच्याकडून प्रशिक्षण सेवा मिळवावी. विद्यार्थी विकास विभागाने ठरवून दिलेल्या प्रमाणे मानधन देण्यात यावे.

सदर उपक्रम विभाग वार तीन महाविद्यालयांना (बारा महाविद्यालयांमागे तीन महाविद्यालयांना १२ : ०३) एका शैक्षणिक वर्षाला दिला जाईल तसेच दुस-या वर्षी मागील वर्षी दिलेल्या महाविद्यालयांना हा उपक्रम मिळणार नाही. दुस-या वर्षी नविन महाविद्यालयांना हा उपक्रम मिळू शकेल. त्यासाठी प्रस्ताव सादर करणे आवश्यक असेल.

**अभियानाची पात्रता** :- ही योजना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्था व विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा- विभाग यामध्ये पदविका, पदवी पदव्युत्तर शिक्षण घेणा-या नियमित विद्यार्थीनींकरीता राबविण्यात येते.

**अभियानासाठीचे अनुदान :-** या योजनेसाठी विद्यापीठाकडून १५ हजार रुपये अनुदान देण्यात येईल. खर्चाचे नियोजन खालीलप्रमाणे आहे.

- सदर उपक्रमासाठी विषयतज्ञ/ साधन व्यक्तीचे मानधन रु. १ हजार प्रती सत्र **RTGS/NEFT द्वारे देणे.**
- फोटो, बॅनर,पोस्टर, चहा-नास्ता इ. अनुषंगीक खर्चासाठी. **(अनुदानाच्या २० % कमाल मर्यादा)**
- क्षेत्र भेटीसाठी प्रवास खर्च **(अनुदानाच्या २० % कमाल मर्यादा)**
- आपल्या परिसरातील विद्यापीठाचे विविध प्राधिकरण सदस्य/ अधिकारी यांना निमंत्रीत करावे.
- सदर उपक्रमाचे हिशेब उपक्रम समाप्ती नंतर १५ दिवसाच्या आत सादर करावेत. **(प्राचार्य व विद्यार्थी विकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीने)**
- या उपक्रमांचे उद्‌घाटन समारंभ करता येणार नाही फक्त समारोप समारंभ घेण्यात यावा.
- सदर उपक्रमाचे जिओ टॅग फोटो अहवाला सोबत लावणे आवश्यक असेल.
- सदर योजनेमध्ये एनसीसीचे विद्यार्थी भाग घेऊ शकणार नाहीत.

- योजना राबविण्यात विषयी जिल्हा समन्वयक विद्यार्थी विकास अधिकारी यांचे अभिप्राय आवश्यक घ्यावेत व विद्यार्थ्यांना दिल्या जाणा-या प्रमाणपत्रावर जिल्हा समन्वयकांची स्वाक्षरी घ्यावी.
- सदर उपक्रमास विद्यार्थी विकास विभागाच्या नियमानुसार अनुदान उपलब्ध असेल. सदर उपक्रमाची युटिलायझेशन सर्टिफिकेट व हिशेब संदर्भात यापुर्वीचे नियम लागू असतील.

**३) मिशन साहसी अभियान -**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात शिक्षण घेणा-या विद्यार्थिनींना अभ्यासेत्तर इतर उपक्रमात सहभागी होण्यास प्रवृत्त करुन त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास व विविध अंगाने आत्मनिर्भर व सशक्त भारताचे स्वप्न पुर्ण करण्याकरीता महिलांची एक महत्वपुर्ण भुमिका राहिलेली आहे. या उद्देशाने युवतींमध्ये राष्ट्राभिमान, राष्ट्रसेवा व शिस्त हे मुल्य रुजविण्यासाठी व त्यांना या दृष्टीकोनातून कौशल्य युक्त बनविण्यासाठी ही योजना शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून विद्यापीठ क्षेत्रातील संलग्नित महाविद्यालय व विद्यापीठ प्रशाळा-विभाग मधील पदविका, पदवी, पदव्युत्तर विद्यार्थ्याकरीता लागू करण्यात येत आहे.

**अभियानाचे स्वरुप :-**

या मिशन साहसी अभियान हा उपक्रम युवती सभा अंतर्गत घेण्यात यावा. पाच दिवस रोज दोन तास, त्याच महाविद्यालयातील ४० विद्यार्थीनी करता, स्वरक्षणार्थ कराटे किंवा योगा शिक्षण, स्त्री आरोग्य विषयक जागृती समस्या संदर्भात उपाययोजना, स्त्री स्वयंरोजगार विषयक माहिती देणे, या कार्यशाळेत साधन व्यक्ती म्हणून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या महिलांना आमंत्रित करावे., व्याख्यान न ठेवता खुले चर्चा सत्र तसेच गट चर्चा ठेवावी., विद्यार्थीनींना त्यांचे अनुभव शेअर करण्याकरीता व्यासपीठ उपलब्ध करुन द्यावे.

सदर उपक्रम विभाग वार तीन महाविद्यालयांना (बारा महाविद्यालयांमागे तीन महाविद्यालयांना १२ : ०३) एका शैक्षणिक वर्षाला दिला जाईल तसेच दुस-या वर्षी मागील वर्षी दिलेल्या महाविद्यालयांना हा उपक्रम मिळणार नाही. दुस-या वर्षी नविन महाविद्यालयांना हा उपक्रम मिळू शकेल. त्यासाठी प्रस्ताव सादर करणे आवश्यक असेल.

**अभियानाची पात्रता** :- ही योजना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्था व विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा- विभाग यामध्ये पदविका, पदवी पदव्युत्तर शिक्षण घेणा-या नियमित विद्यार्थीनींकरीता राबविण्यात येते.

**अभियानासाठीचे अनुदान :-** या योजनेसाठी विद्यापीठाकडून १५ हजार रुपये अनुदान देण्यात येईल. खर्चाचे नियोजन खालीलप्रमाणे आहे.

- सदर उपक्रमासाठी विषयतज्ज्ञ/ साधन व्यक्तीचे मानधन रु. १ हजार प्रती सत्र **RTGS/NEFT व्दारे देणे.**
- फोटो, बॅनर,पोस्टर, चहा-नास्ता इ. अनुषंगीक खर्चासाठी. **(अनुदानाच्या २० % कमाल मर्यादा)**
- क्षेत्र भेटीसाठी प्रवास खर्च **(अनुदानाच्या २० % कमाल मर्यादा)**
- आपल्या परिसरातील विद्यापीठाचे विविध प्राधिकरण सदस्य/ अधिकारी यांना निमंत्रीत करावे.
- सदर उपक्रमाचे हिशेब उपक्रम समाप्ती नंतर १५ दिवसाच्या आत सादर करावेत. **(प्राचार्य व विद्यार्थी विकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीने)**
- या उपक्रमांचे उद्घाटन समारंभ करता येणार नाही फक्त समारोप समारंभ घेण्यात यावा.
- सदर उपक्रमाचे जिओ टॅग फोटो अहवाला सोबत लावणे आवश्यक असेल.
- सदर योजनेमध्ये एनसीसीचे विद्यार्थी भाग घेऊ शकणार नाहीत.
- योजना राबविण्यात विषयी जिल्हा समन्वयक विद्यार्थी विकास अधिकारी यांचे अभिप्राय आवश्यक घ्यावेत व विद्यार्थ्यांना दिल्या जाणा-या प्रमाणपत्रावर जिल्हा समन्वयकांची स्वाक्षरी घ्यावी.
- सदर उपक्रमास विद्यार्थी विकास विभागाच्या नियमानुसार अनुदान उपलब्ध असेल. सदर उपक्रमाची युटिलायझेशन सर्टिफिकेट व हिशेब संदर्भात यापुर्वीचे नियम लागू असतील.

"युवती सभा" अंतर्गत अग्निवीर सैन्यदल भरती प्रशिक्षण , आत्मनिर्भर युवती अभियान व मिशन साहसी अभियान या कार्यक्रमांची स्वतंत्र नियमावली या योजना अंमलबजावणी अहवाल, विद्यार्थीनींचे उपस्थिती पत्रक, खर्चाची बिले, मानधन अदायगीच्या पावत्या (Voucher), मा.प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख व विद्यार्थी विकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीचे विनियोग प्रमाणपत्र (Utilization Certificate) व छायाचित्रे इ. **कार्यक्रम संपल्यानंतर १५ दिवसाच्या आंत** विद्यार्थी विकास विभागात सादर करावीत.तसेच विद्यापीठ समान लेखासंहिता (Common Account Code) लागू असल्याने उपक्रमासाठी पुरवठाधारकाकडून करावयाची खरेदी रु.५,०००/- किंवा त्यापेक्षा जास्त रकमेची असल्यास विहित पध्दतीने कमीत कमी तीन दरपत्रके मागवावीत व त्रिसदस्य समितीद्वारे एक पुरवठादार निश्चित करावा आणि त्याचेकडून खरेदी करावी. देयक रक्कम रोख विरहीत (Cashless) पध्दतीने अदा करावी.

- **वर्षभर चालणारे नियमित विशेष उपक्रम :-**

  १) पर्यावरण संरक्षण व संवर्धन अभियान २) महिला आरोग्य संर्वधन ऋतूमती अभियान ३) नवतंत्रज्ञान कौशल्य अभियान ४) नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणी अभियान ५) स्वतंत्र भारताची कामगिरी दाखवणारे प्रदर्शन ६) स्वातंत्र्य लढयातील अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांच्या योगदानावर प्रकाश टाकणारे पोस्टर प्रदर्शन ७) वृक्ष मित्र अभियान ८) हवामान बदल जनजागृती अभियान

  **नियम व अटी :-**

  १) या उपक्रमासाठी सुरुवातीला महाविद्यालयाने स्थान निश्चिती करणे आवश्यक आहे. सदरचे स्थान दत्तकगाव किंवा वाडीवस्ती व शहरातील दुर्गम भाग असू शकते.

  २) स्थान निश्चित झाल्यानंतर महाविद्यालयाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मदतीने निवडलेल्या गावाचे सर्व्हेशन करुन घ्यावे.

  ३) सर्व्हेशनामध्ये ज्या समस्या जाणवतील त्या दुर करण्यासाठी आरोग्य केंद्र स्वयंसेवी संस्था यांच्या मदतीने कार्यशाळा/ शिबीरे आयोजित करावेत.

  ४) या अंतर्गत घेण्यात येणा-या नविन शैक्षणिक धोरण अंमलबजावणी अभियानामध्ये महाविद्यालयाने नविन शैक्षणिक धोरण २०२० मधील वेगवेगळया मुद्यांच्या अनुषंगाने वर्षभर कार्यशाळा व व्याख्याने आयोजित करावीत. ज्यामध्ये विद्यापीठाशी निगडीत संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व पालकांचा समावेश असावा.

  ५) स्वातंत्र्य भारताची कामगीरी दाखविणारे प्रदर्शन या अंतर्गत मागील ७५ वर्षात भारताने विविध क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा आढावा विद्यार्थी व सामान्य नागरीकांपर्यत पोहचविण्यासाठी वेगवेगळया पोस्टर प्रदर्शनांचे वर्षभर आयोजन करावे.

  ६) स्वातंत्र्य लढयातील अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांच्या योगदानावर प्रकाश टाकणारे पोस्टर प्रदर्शन या उपक्रमांतर्गत आपल्या भागातील अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांची माहिती गोळा करुन पोस्टर तयार करावे व सदरच्या पोस्टरचे प्रदर्शन महाविद्यालयात/ शहराच्या विविध भागात आयोजित करावे.

  ७) शेवटी एक अहवाल तयार करुन विद्यार्थी विकास विभागास सादर करणे करणे बंधनकारक राहील.

- **अमृतवर्षा निमित्त नियमित एक दिवसीय उपक्रम :-**

  १) अमृत महोत्सवी वर्षाच्या अनुषंगाने शिक्षणाचे महत्व या विषयांवर एक दिवसीय कार्यशाळा २) अमृत महोत्सवी वर्षाच्या अनुषंगाने शाश्वत विकास या विषयावर एक दिवसीय बेबीनार ३) पुढील २५ वर्षातील आपल्या कल्पनेतील विद्यापीठ या विषयावर एक दिवसीय चर्चासत्र ४) अमृत महोत्सवी वर्षाच्या अनुषंगाने डिजीटल इंडीयाचे फायदे या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा

  **नोट :-**

  वरील दोन्ही उपक्रमांना विद्यापीठाने रु. १५ हजार अनुदान दिलेले आहे त्यांच्या खर्चाचे नियोजन खालीलप्रमाणे करण्यात यावे.

  - सदर उपक्रमासाठी विषयतज्ज्ञ/ साधन व्यक्तीचे मानधन रु. १ हजार प्रती सत्र **RTGS/NEFT व्दारे देणे.**
  - फोटो, बॅनर,पोस्टर, चहा-नास्ता इ. अनुषंगीक खर्चासाठी. **(अनुदानाच्या २० % कमाल मर्यादा)**
  - क्षेत्र भेटीसाठी प्रवास खर्च **(अनुदानाच्या २० % कमाल मर्यादा)**
  - आपल्या परिसरातील विद्यापीठाचे विविध प्राधिकरण सदस्य/ अधिकारी यांना निमंत्रीत करावे.
  - या उपक्रमांचे उद्घाटन समारंभ करता येणार नाही फक्त समारोप समारंभ घेण्यात यावा.
  - सदर उपक्रमाचे जिओ टॅग फोटो अहवाला सोबत लावणे आवश्यक असेल.
  - सदर योजनेमध्ये एनसीसीचे विद्यार्थी भाग घेऊ शकणार नाहीत.
  - योजना राबविण्यात विषयी जिल्हा समन्वयक विद्यार्थी विकास अधिकारी यांचे अभिप्राय आवश्यक घ्यावेत व विद्यार्थ्यांना दिल्या जाणा-या प्रमाणपत्रावर जिल्हा समन्वयकांची स्वाक्षरी घ्यावी.
  - सदर उपक्रमाचे हिशेब उपक्रम समाप्ती नंतर १५ दिवसाच्या आत सादर करावेत. **(प्राचार्य व विद्यार्थी विकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीने)**
  - सदर उपक्रमास विद्यार्थी विकास विभागाच्या नियमानुसार अनुदान उपलब्ध असेल. सदर उपक्रमाची युटिलायझेशन सर्टिफिकेट व हिशेब संदर्भात यापुर्वीचे नियम लागू असतील.

-------------------------------

# UTILISATION CERTIFICATE

**Director,**
**Students Development Department,**
**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University,**
**Jalgaon – 425001**

Ref.: Sanction Letter No. ________________________________ Date _____/______/202
For the Scheme of ______________________________________________________

Certified that, with reference to above , the amount of actual receipt of grant / Advance Rs.__________________ on Date ____/____ /202 is Fully / Partially utilized to conduct the aforesaid programme as per following table in accordance with the terms and Conditions as laid down by the NMU's DSW.

| Sr.No. | Amout of Actual Spent on | Amount in Rs. | BillNo. & Date | Remark / Vendor name |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | Total - | | | |
| Total Rs.________________ | | | | |

The unutilized amount of grant / Advance is refunded to tht University by Demand Draft No, ---------------Date ___/____/202 for Rs. _____________ (Rs.______________________________)
To settle the afore said Grant / advance.

Further we certify that, the grant received , utilized & balance refunded as above is accounted in the books of account of our college as per the purpose for which it is sanctioned. If, as a result of check or audit objection, some irregularity is noticed at a later stage, action will be taken to refund of regularize the objected amount. All original documents are retained by our college for our audit purpose & can be made available to the university whenever required in future.

Place ______________ Date ______________

**Student Development Officer** **Principal / Director/ HOD**